# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०९/०५/२०२४ (गुरूवार) सायंकाळ**

---

## अट्टल मोटारसायकल चोरट्यास बुट्टीबोरी पोलीसांनी केले जेरबंद

फिर्यादी नामे रविंद्र मनोहर गौरकार वय ३८ वर्ष, रा. कन्हाळगाव सातगाव ता. हिंगणा जि. नागपुर हे आपल्या हिरो होंडा स्प्लेंडर मो.सा. क्र. MH-40/K-6847 किंमती १५,०००/— रू. ने दि. २८/०१/२०२४ रोजी १२.०० वा. दरम्याण बुट्टीबोरीत मुथुट फायनान्स मध्ये पैसे भरण्याकरीता गेला होता नंतर तो मोसाने तिरूपती वाईन शॉप बुट्टीबोरी येथे गेला असता त्याने आपली मोसा वाईन शॉप बुट्टीबोरी समोर उभी ठेवली व १० मी. परत आला असता त्याला त्याची हिरो होंडा स्पेंडर मो. सा. क्र. MH-40/K-6847 किंमती १५,०००/— रू. ही दिसुन आली नाही त्यानंतर फिर्यादी हा काम करण्याकरीता अहेरी गडचिरोली येथे निघुन गेला होता तो दिनांक ०४/०५/२०२४ रोजी परत आल्याने त्याची हिरो होंडा स्पेंडर मो.सा. क्र. MH-40/K-6847 किंमती १५,०००/— रू. ही कुणीतरी अज्ञात चोराने दिनांक २८/०१/२०२४ चे दुपारी १२.०० ते १२.१० वा. दरम्यान चोरून नेली अशा फिर्यादीचे रिपोर्ट वरून पो.स्टे. ला सदरचा गुन्हा नोंद असुन तपासावर आहे.

सदर गुन्हयाचे तपासामध्ये अनोळखी आरोपीचा शोध घेणे कामी वरीष्ठांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे गुन्हयाचे तपासकामी विशेष पथक गठीत करून अनोळखी आरोपीचा शोध घेणे सुरू केले. गठीत पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी गोपनिय मुखबिर पेरून गुन्हयातील अनोळखी आरोपीचा शोध घेत असतांना मुखबीर द्वारे मिळालेल्या माहीती वरून मौजा बुट्टीबोरी वार्ड क्र. ६ राजीक बब्बु शेख, वय ३२ वर्षे रा. बुट्टीबोरी, वार्ड क्र. ०६ ता. जि. नागपुर यास गुन्हया संबंधाने विश्वासात घेऊन विचारपुस केली असता त्याने गुन्हा केल्याची कबुली दिली. यावरूण वरील नमुद आरोपीस सदर गुन्हयात अटक करण्यात आली व सदर आरोपी हा अट्टल मोसा चोर असल्याने त्याचा गुन्हयाव्यतीरीक्त पोस्टे बुट्टीबोरी येथील अप. क्र. ३६२/२४ या गुन्हयातील मोसा टि.व्ही.एस. रायडर मो.सा. क्र. MH-40 CR-2637 किंमती ९०,०००/— रू. अप. क्र. ३६९/२४ हिरो होंडा स्प्लेंडर मो.सा. क्र. MH-40K-6847 किंमती १५,०००/— रू. या गुन्हयातील मोसा चोरी केल्याचे कबुल केल्याने त्याचेकडुन अशा एकुण ०२ मोसा किंमती १०५०००/— रू चा माल हस्तगत करण्यात आला आहे.

सदर गुन्हयाचा तपास मा. पोलीस अधिक्षक साहेब श्री. हर्ष पोद्दार, अप्पर पोलीस अधिक्षक श्री. रमेश धुमाळ, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्रीमती पुजा गायकवाड व पोलीस निरीक्षक श्री. हृदयनारायण यादव यांचे मार्गदर्शनाखाली गठीत विशेष पथकातील अधिकारी सपोनी प्रशांत लभाणे, पोहवा आशिष टेकाम, पोहवा युनूस खान, पोहवा कृणाल पारधी, पोशि आशिष कछवाह व पोशि माधव गुट्टे यांनी कामगिरी पार पाडली असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा कृणाल पारधी पोस्टे बुट्टीबोरी हे करीत आहे.

## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपींविरूद्ध कारवाई

आज दि. ०९/०५/२०२४ रोजी पोहवा दिनेश काकडे, पोशि गणेश उईके, पोशि पंकज शहारे व पोशि सचिन सलामे हे खाजगी वाहनाने दिनांक ०९/०५/२०२४ वेळ १०.४० वा. नुसार पोस्टे परीसरात पेट्रोलींग करीता फिरत असतांना मुखबिरव्दारे खबर मिळाली कि, पांढुर्णा ते नागपुर रोडने आयसर ट्रक क्र. एम एच–२९/बी ई–७३३३ मध्ये गोवंशाची कत्तलीसाठी अवैध्यरित्या वाहतुक होत आहे. अशा मिळालेल्या खबरे वरून सावळी फाटा येथे पोहचुन नाकाबंदी करीत असतांना दिनांक ०९/०५/२०२४ चे ११.४५ वा. दरम्यान पांढुर्णा (ए पी) कडुन आयसर ट्रक क्र. एम एच २९/बी ई– ७३३३ हे नाकाबंदीचे दिशेने येताना दिसला. सदर वाहन चालकास हाताचा ईशारा करून वाहन थांबविण्याचा ईशारा केला असता आयसर ट्रक क्र. एम एच २९/बी ई– ७३३३ चे चालकाने आपले ताब्यातील आयसर नाकाबंदीचे ठिकाणी न थांबविता सावनेरचे दिशेने पळु लागला त्याचा स्टाफने पाठलाग केला असता आयसर ट्रक आयसर ट्रक क्र. एम एच २९/बी ई– ७३३३ चे चालकांनी आपले ताब्यातील वाहन सावळी फाटयाचे थोडे दुरवर जावुन थांबवले व आयसर ट्रक क्र. एम एच २९/बी ई– ७३३३ हे पांढुर्णा ते नागपुर जाणाऱ्या रोडवर उभे करून जंगली झाडा झुडपाचा फायदा घेवुन पळून गेला.

सदर आयसर ट्रक आयसर ट्रक क्र. एम एच २९/बी ई– ७३३३ किंमती १०,००,०००/– रू चे मागच्या डाल्याची पिवळया रंगाची ताडपत्री बाजुला करून पाहणी केली असता त्यामध्ये १) ०७ नग गाई/कालवड गौवंश प्रत्येकी किंमत १०,०००/– रू प्रमाणे किंमती ७०,०००/– रू २) १३ नग गोरे गौवंश प्रत्येकी किंमत १५,०००/– रू प्रमाणे किंमती १,९५,०००/–रू. असे एकुन १२,६५,०००/– रू चे गोवंश जनावरे यांना अत्यंत कुर व निर्दयतेने वाहनात डांबुन आखुड दोरीने पाय व तोंड बांधुन चाऱ्या पाण्याची सोय न करता दाटीवाटीने अपुऱ्या जागेत कोंबुन असल्याचे दिसले. घटनास्थळाहुन १) ०७ नग गाई/कालवड गौवंश प्रत्येकी किंमती १०,०००/– रू प्रमाणे किंमत ७०,०००/– रू २) १३ नग गोरे गौवंश प्रत्येकी किंमत १५,०००/–रू. प्रमाणे किंमती १,९५,०००/–रू. व ०३ नग मृत गोरे/कालवड असे एकुण २,६५,०००/– रू चे गोवंश जनावरे व आयसर ट्रक क्र. एम एच २९/बी ई– ७३३३ किंमती १०,००,०००/– रू. असा एकुण १२,६५,०००/– रू चा माल जप्त करण्यात आला.

जप्त करण्यात आलेल्या गोवंश जनावरांना पुढील देखभाल व उपचार करीतो जय श्री कृष्ण भगवान गोशाळा गोंडेगाव, ता. नरखेड येथे दाखल करण्यात आले आहे. फिर्यादीचे लेखी रिपोर्टवरून पोलिस स्टेशन केळवद येथे कलम ४२९, २७९, ३४ भादंवि. सहकलम ११(१), (घ), (ड), (च) प्राण्यांना निर्दयतेने वागणुक प्रतीबंधक अधिनीयम १९६०, सहकलम ५(अ), ९ महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधीनीयम १९९५, सहकलम ११९ मपोका. सहकलम १८४ मोवाका. प्रमाने गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदर गुन्हयाचा तपास मा. पोलीस अधिक्षक साहेब श्री. हर्ष पोद्दार, अप्पर पोलीस अधिक्षक श्री. रमेश धुमाळ, मा. अनिल म्हस्के, उपविभागीय पोलिस अधिकारी सावनेर विभाग, मा. राकेश साखकर ठाणेदार पोलिस स्टेशन केळवद यांचे मार्गदर्शनात पोहवा दिनेश काकडे, पोशि गणेश उईके, पोशि पंकज शहारे, पोशि सचिन सलामे यांनी केली. पुढील तपास पोहवा दिनेश काकडे हे करत आहेत.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर